# महात्मा गांधीः नेतृत्व,आंदोलने व सद्यस्थिती

प्रा.डॉ.सचितानंद शं.बिचेवार
पी.डी.जैन कला महाविद्यालय अनसिंग ता.जि.वाशिम .



## प्रस्तावना :–

आधुनिक काळातील भारताला मिळालेले महत्वपुर्ण रत्न म्हणजे महात्मा गांधी हे होत.आज भारतामध्येच नव्हे तर सुपर्ण जगात गांधीच्या विचारांची चर्चा,चिंतन आणि प्रेरणा अत्यंत महत्वाची मानली जात आहे.महात्मा गांधीचे राजकीय, सामाजिक,नैतिक,अध्यात्मिक, आर्थिक,ग्रामोद्यारक,खादी विषयक आदि स्वरूपाचे कार्य अत्यंत महत्वाचे मानले जाते.म्हणुनच देशाचे कोणतेही महत्वाचे राजकीय पद न घेता ही गांधी इतिहासामध्ये अजरामर झाले आहेत.आज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातीलनेतृत्वाला गांधीचा आधार घेणे आवश्यक वाटत आहे.अशा या महात्मा गांधीच्या यशामध्ये,आंदोलनामध्ये कोणती शक्ती होती,ज्यामुळे बलाढय इंग्रज सरकारही हादरले होते. तसेच भारतीयांच्या मनामध्येही गांधीनी कायमचे घर केले होते.आज आणि उद्याही नेतृत्वास लोकसंग्रह,लोकनेतृत्व करून व्यवस्था परिवर्तन करावयाचे असल्यास,सत्ता प्राप्त करावयाची व लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवयाचे झाल्यास गांधीजींची नैतिक विचारधारा तथा बैठक अत्यंत प्रेरणादायी आहे. म्हणूनच सकारात्मक सामाजिक कार्यात यश मिळवायचे असल्यास,मानव उध्दाराचे कार्य करावयाचे असल्यास,महात्मा गांधीच्या नेतृत्वातील,आंदोलनातील कोणते पैलु महत्वाचे ठरू शकतील याचा आढावा प्रस्तुत शोध निबंधामध्ये घेतला आहे.

## महात्मा गांधी एक परीचय :

भारतीय जनमनावर अधिराज्य करणारा अनभिषिक्त सम्राट,सकारात्मक दृष्टीनेच नव्हे तर नकारात्मक दृष्टीनेही ज्यांची दखल घेणे अपरिहार्य ठरावे असा हा महामानव, गुजरात मधील पोरबंदर येथे १८६९१ मध्ये जन्मला. महात्मा गांधीने प्रथम अध्ययन,चिंतनाने जीवनाचे मुख्य लक्ष्य निश्चित केले. त्यानंतर लक्ष्य प्राप्तीसाठी अभिनव तंत्राचा,सत्य, अहिंसात्मक मार्गाचा वापर करून,जनआंदोलन उभारून या देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. सोबतच समाज व राष्ट्रउन्नतीसाठी अनेक उपक्रम त्यांनी राबविले. १९४८पर्यंत झंझावाताप्रमाणे जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात कार्यरत असणारा आदर्श नेता शरीराने भारताला सोडून गेला तरी आजही त्यांच्या विचारांचा प्रभाव कमी न होता मोठया प्रमाणात वाढतच आहे.

## गांधीच्या चळवळीतील विषय,नियोजन :

महात्मा गांधीचे केलेले प्रत्येक आंदोलन आणि कार्य नियोजनबध्द पध्दतीने त्यांनी केले होते.गांधीचे राजकीय गुरू गोपाळकृष्ण गोखल्यांनी त्यांना प्रथम संपूर्ण भारत भ्रमण करून सार्वजनिक कार्यासाठी तयारी२ करण्याचे सूचविले होते.त्यानुसार त्यांनी भारत दर्शन करून लोकमत,समस्या जाणून घेतल्या.त्या आधारावरच भविष्यातील कार्याची दिशा त्यांनी ठरविली होती.भारत उत्थानात ब्रिटीश महत्वाची भूमिका बजावू शकतात, पण ते कूचराई करतात,त्यांची निती भारतात शोषनाची,दडपशाहीची आहे. म्हणून त्याविरोधी आंदोलनात्मक पवित्रा त्यांना आता महत्वाचा वाटला.दक्षिण अफ्रिकेतील अनुभवाचा आधार घेत गांधीनीं प्रथम १९२० असहकार आंदोलन पूकारले.यामध्ये हिंदु–मुस्लीम समन्वय साधुन स्वदेशी व बहिष्कार तंत्राचा वापर करून ब्रिटीश विरोधी जनमत प्रक्षुब्ध करण्याचे प्रयत्न त्यांनी सुरू केले.याचवेळी राजकीय संघटन छोटे शहर आणि गावातील लोकापर्यंत घेवुन जाण्याचा त्यानुसार कॉंग्रेसचे स्वरूप,दिशा बदलविण्याचा त्यांनी मोठा प्रयत्न केला.३यामूळे साहाजिकच शेतकरी,कामगार,डॉक्टर, वकील,नोकरदार,विद्यार्थी स्त्रीया आदि वर्ग या आंदोलनात सक्रियपणे सहभागी होऊन ब्रिटीशांपुढे मोठे आव्हान उभे राहू लागले.

पुढे सविनय कायदेभंग आंदोलनामध्ये तर मिठाचा सत्याग्रह,धारासना सत्याग्रह या सारख्या मुद्याच्या आधारे जनमनाची नाडी ओळखून सर्वांना आंदोलनामध्ये सहभागी करून घेण्याचे नियोजन त्यांनी केले.अन्यायी ब्रिटीश सरकार विरोधी आंदोलनात्मक कार्य म्हणजेच आपला धर्म आहे असे सांगुन गांधीनी वेद–वेदाचा अभ्यास कठीण आहे,पण मिठाचा कायदा मोडणे सर्वांना सहज

शक्य आहे,४ म्हणून अशा प्रकारच्या सर्वांना शक्य होणाऱ्या पण ब्रिटीशांच्या आर्थिक व राजकीय मर्मावर घाला घालणाऱ्या बाबीं गांधीनी आंदोलनाचा आधार मानला.त्यामुळे साहाजिकच गांधी आणि त्यांची आंदोलने जनमानसात लोकप्रिय झाली.

गांधीजीच्या मते,हिंदू-मुस्लीम व अन्य धर्मिय यांनी बंधूभाव प्रेमाणे परस्परासोबत सोबत राहणे,स्वराज्य प्राप्तीसाठी आवश्यक होते.५याचा प्रभाव पाडण्यासाठीच गांधीनीं ब्रिटीशाविरोधात सर्वांना सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला.१९४२ च्या '' चले जाव '' चळवळीत गांधीजींच्या परिपक्वतेचा परिचय संपूर्ण हिन्दूस्थानला झाल्यामूळेच संपूर्ण भारतीय वर्ग या आंदोलनात सहभागी झाला.त्यामुळे भारताला स्वातंत्र्य देणे ब्रिटीशांना भाग पडले.त्यातूनच भारत १९४७ ला स्वंतत्र झाला.गांधीच्या या राजकीय लढया सोबतच त्यांचा मानवमुक्तीचा,गरीबीमुक्तीचा,जातीमुक्तीचा,ग्रामविकासाचा,स्वावलंबनाचा,स्वच्छतेचा सोबतच सत्य व अहिंसेचा लढाही तेवढयाच तिव्रतेने सुरू होता.भारत-पाकीस्तान विभाजन नंतर कलकत्ता,पंजाब,दिल्ली अशा अनेक ठिकाणी जे सांप्रदायिक दंगे उद्‌भवले ते निपटण्यासाठी गांधीनी त्यासाठीही प्राणपणाने काम केले.म्हणूनच लंडन टाईम्सचा एक पत्रकार म्हणतो की, ' जे काम सेनेच्या काही डिव्हीजनला करता आले नाही ते गांधीजींच्या एक उपवासाने केले.'६यावरून त्यांच्या शांती कार्याची महती कळून येते.असेच कार्य प्रत्येक क्षेत्रात गांधीनी केलेले दिसुन येते.म्हणूनच महात्मा जवळपास प्रत्येक ठिकाणी यशस्वी झाले, लोकप्रिय झालेले दिसून येतात.त्यांच्या कार्याची,आंदोलनाची, यशाची महती त्यावेळपेक्षाही आता मोठया प्रमाणात वाढत आहे.हा सर्वासाठी प्रेरणेचा,अभ्यासाचा व चिंतन-चिकित्सेचा विषय आहे.

### *गांधी आंदोलनाची,नेतृत्वाची विशेषतः :*

१) गांधीच्या प्रत्येक लढयात,कार्यात,आंदोलनात सत्यता,अंहिसात्मकता,प्रामाणिकता व देशासाठी त्याग यास प्रमाण स्थान होते.
२) साधेपणा,कमीत कमी बडेजाव उदा.मीठ सत्याग्रहासाठी दांडी यात्रेत गांधीनी आदेश दिले होते की,दुपारी अथवा रात्री थांबण्यासाठी मकान आवश्यक नसून सावलीसह स्वच्छ जागा ठिक राहील.भोजन साधे राहील.ज्यामध्ये रोट,चपाती,खिचडी,दुध-दही यापेक्षा काही नको.७
३)गांधीजींचा नकारात्मक ते पेक्षा विधायक कार्यक्रमावर अधिक भर होता. उदा.जातीय ऐक्य,ग्रामोद्योग,वर्धाशिक्षण स्त्रियांची सेवा,शेतकरी,मजुर,विद्यार्थी कल्याण,आर्थिक समानता खादीचा वापर,दारूबंदी,अस्पृश्यता निवारण,हिंदु-मुस्लीम एकता,शारिरीक श्रमास महत्व८आदि.
४) स्वतः परिसराचा दौरा,स्थानिक समस्या समजून त्यावर उपाययोजना,चळवळीत,ब्रिटीश विरोधी आंदोलनात सर्वाचा सहभाग यावर कटाक्ष. यामूळेच स्त्री-पूरूष,गरीब-श्रीमंत,उच्च-कनिष्ठ,उच्च शिक्षीत-अशिक्षीत अशा सर्वांशी नाते जोडण्याचा,सोबत घेण्याचा प्रयत्न.
५) लोकांकडून पैसा,देणगी पेक्षा सहकार्य,पाठबळीची त्यांनी अधिक अपेक्षा केली ९
६) गांधीजींचे समग्र आंदोलने कोणत्याही व्यक्तींच्या विरोधात नसून ब्रिटीशांच्या धोरणा विरोधात होती.व्यक्ती व्देश त्यांना मान्य नव्हता.अपयशाने न खचता पूर्ण शक्तीने उभारी घेणे,यासाठी स्वतःवर,जनतेवर,देशावर ठाम विश्वास,जनतेप्रति,त्यांच्या हिताप्रति प्रचंड तळमळ ही त्यांची विशषतःहोती.
७) स्वतः प्रथम नेतृत्व करून कष्ट घेणे,प्रसंगी त्यागास,बलिदानास तयार असणे ही त्यांची महत्वाची विशेषतः होती.
८) सर्वांत महत्वाचे म्हणजे स्वतःच्या, पत्नी,कुटुंब,मुले यांच्या स्वार्थाची शून्य टक्के अपेक्षा करून शंभर टक्के त्यागाने त्यांनी देशभर माणसे जोडली.

### *महात्मा गांधी व सद्यस्थिती :*

१९३० मध्ये ब्रिटीश पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनी गांधींना ' अर्धनग्न फकीर' म्हणून त्यांची कुचेष्ठा केली होती.१० त्या फकिरानेच भारताला ब्रिटनच्या तावडीतून मुक्त केले.या सोबतच त्यांच्या विधायक कार्याने केवळ भारतीयांच्याच नव्हे तर अखिल मानव जातीच्या मनात घर केले.त्यांची शत्रूवर,समस्येवर प्रतिस्पर्ध्यांवर मात करण्याची सत्य आणि अंहिसेच्या मार्गाची महती आज जगातील तज्ञाने,राजधूरंधराने,मानवतेच्या पायीकांनी मान्य केली आहे.म्हणूनच जगामध्ये अनेक विद्वान,सुधारक, नेतृत्व,संस्था, पक्ष,चळवळी गांधी मार्गाचा अवलंब करून यश मिळविण्यासाठी कार्य करतांना दिसत आहेत.भारतातील प्रत्येक पक्ष आणि नेता महात्मा गांधीच्या विचारांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष वापर करतांना दिसतो आहे.प्रश्न कोणताही असो मार्ग गांधीचा हा एक प्राथमिक संकेत बनला आहे.तरीपण महात्मा गांधींना ज्या पध्दतीने प्रत्येक आंदोलनात,कार्यात यश मिळाले.त्या पध्दतीने आजच्या कोणत्याही नेतृत्वास,व्यक्तीस,पक्ष अथवा संघटनास अपेक्षीत यश मिळतांना दिसत नाही.याचे प्रमुख कारण गांधी नेतृत्वात आणि सद्यस्थितील जवळपास सर्वच नेतृत्वात असलेली निष्ठेची,प्रामाणिकतेची,दायीत्वाची, निस्वार्थतेची तफावत असावी असे वाटते.

### *सारांश व निष्कर्ष :*

आज महात्मा गाधीचे नाव, विचार, आंदोलनातील त्यांची हत्यारे, साधने वापरून भारतातील, जगातील अनेक देशातील व्यक्ती, संस्था, संघटना, पक्ष, चळवळी आपल्या मागण्या मान्य करून घेण्याचा, प्रतिस्पर्ध्यावर मात करण्याचा, यश प्राप्तीचा,समस्या सोडविण्याचा, विजय मिळवण्याचा प्रयत्न करतांना सार्वजनीक पध्दतीने दिसून येतात. परंतु या देशात, जगात गांधी सारखा दुसरा महात्मा,त्यांच्या सारखे नेतृत्व व त्यांच्या प्रमाणे यश, नावलौकिक, प्रभाव कोणालाही प्राप्त करता आला नाही. यांचे महंत्वाचे मर्म त्यांच्या सारखी स्वभावतः असणारी नेतृत्वाची विशेषतः सध्यस्थितीत कोणालाही साध्य करता आली नाही. म्हणूनच गांधीच्या केवळ नावाचा वा विचारांचा उदोउदो करून अपेक्षित यश प्राप्त करणे कोणालाही शक्य होणार नाही. त्यासाठी व्यक्ती असो वा संस्था, संघटना, पक्ष, या सर्वाना गांधीमार्गाने जावयाचे असल्यास गांधी तत्वाचा अभ्यास करून त्यांच्या नेतृत्वातील महत्वाचे पैलू, विशेषतः

स्वतः अंगीकारावे लागतील. शंभर टक्के त्याग व शून्य टक्कें लाभाची अपेक्षा ठेवली तरच कायमचा प्रभाव,सत्ता, यश,मिळविता, टिकविता येणार आहे. यासाठीच नेतृत्व म्हणून गांधींना समजून घेतानां व्यक्ती अथवा पक्ष, संघटनांना या बाबींचे चिंतन महत्वाचे आहे.

### संदर्भ व टिपा :

१.नंदा बी. आर .(अनु) श्यामू संन्यासी, महात्मा गांधी एक जीवनी ,सस्ता साहित्य मंडळ प्रकाशन , नई दिल्ली , २०११ पृ.क्र. १४
२.गांधी मो. क. (संक्षिप्तकार),भारतन कुमारप्पा,आत्मकथा,नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद,२०१२ पृ.क्र.२०१
३.नंदा बी.आर, उंपरोक्त प्र.क्र.१४३
४.माचवे प्रभाकर,नमक आंदोलन,सूचना व प्रसारण मंत्रालय,भारत सरकार,नई दिल्ली, १९२२ पृ.क्र.३८
५.कित्ता पृ.क्र.३९
६.नंदा बी.आर,उपरोक्त, पृ.क्र.३०८
७.माचवे प्रभाकर, उपरोक्त, पृ.क्र. ९
८.गांधी मो.क.(अनु) देशपांडे पा.ग.विधायक कार्यक्रम, नवजीवन प्रकाशन मंदिर ,अहमदाबाद जुलै २०१२ कित्ता प्र.१५
९.कित्ता पृ.क्र.१५
१०.https//mr.wikipedia.org/s/akc